
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय अकरावा , भाग पहिला

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

ई साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय अकरावा : भाग पहिला

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/ http://youtu.be/yCHZ85Xzuxc

॥ ॐ परमात्मने नमः ॥

अध्याय अकरावा

# विश्वरूपदर्शनयोग

अकराव्या या अध्यायात । रस दोन असती वसत । एकरूप होईल विश्वरूपात । अर्जुन येथे ॥१॥
जेथे शांतीचे वसतीस्थान । तेथे ब्रह्ममयतेचे प्रकटन । इतर रसांचंही असणं । अनिवार्य तेथे ॥२॥
लग्न असतं वधुवरांचं । पण मिरवणं होतं वऱ्हाड्यांचं । तसे होईल वर्णन इतर रसांचं । मराठीत आता ॥३॥
शांतीत कशी प्रकटते ब्रह्ममयता । काय असते ती विश्वएकरूपता । अनुभवाल ती तृप्तता । आज येथे ॥४॥
जैसे अमावास्येच्या दिवशी । भेटती एकमेका सूर्यशशी । तैसी एकरूपता विश्वासी । अनुभवाल तुम्ही ॥५॥
होता गंगा यमुनेचे मीलन । प्रकटते ते प्रयाग तीर्थस्थान । तैसे या अध्यायाचे श्रवण । मोक्षदायी ॥६॥
प्रयागी गंगा यमुना सरस्वती । या नद्या तीन असती । तैसी शांति ब्रह्म वैश्विकता ती । अकराव्या अध्यायी ॥७॥
घडता शुद्ध ते श्रवण । होते ब्रह्ममयतेचे प्रकटन । ठेवणे अंतरंगी अवधान । साधना अर्जुना ॥८॥
रहस्य ते संस्कृतातलं । श्रीगुरूंनी मराठीत आणलं । आता विश्वएकरूपता अनुभवाल । अंतरी तुम्ही ॥९॥
या ग्रंथासी कोणीही वाचावे । अंतरी अवधान ठेवावे । आणि ब्रह्ममय होऊन जावे । आपोआप ॥१०॥
ऐसे ज्ञान मूर्तिमंत । जयाकारणे ब्रह्म प्रकटतं । ते केवळ शुद्ध श्रवणात । भेटेल तुम्हा ॥११॥
ते ब्रह्ममयतेचे प्रकटन । जे विश्वी एकरूप होणं । आहे तयांचं ते वर्णन । अकराव्यात ॥१२॥
तो हा अध्याय अकरावा । जेथे देव घेई विसावा । प्रकटला तो ब्रह्ममयतेचा ठेवा । अर्जुनासाठी ॥१३॥
केवळ अर्जुनासाठी सांगितलं ज्ञान । चूक ते असं मानणं । हे गीतार्थाचं प्रयोजन । सर्वांसाठी ॥१४॥
श्रोतेहो याच कारणे । माझे तुम्हा विनवणे । आता तुम्ही अवधान ठेवणे । शब्दांलागी ॥१५॥
तुम्हा संतांच्या सभेत । सलगी मी करू असे पहात । मानुणी मज आपले अपत्य । स्वीकारावे मजला ॥१६॥
जैसे पोपटा शब्द शिकवणे । नि तयाने उच्चारिता आनंदणे । वा संतुष्टणे बाळलीलेकारणे । मातेने जैसे ॥१७॥
तैसे मी जे जे बोले । ते प्रभू तुमचेच शिकविले । म्हणून दिजे अवधान आपले । आपण देवा ॥१८॥
हे ब्रह्मज्ञान अतिगोड । जे तुम्हीच लावले झाड । अवधान देऊन तयाची वाढ । करावी आता ॥१९॥
तया ब्रह्मज्ञान फळ येईल । सर्व जगच ब्रह्ममय दिसेल । तुम्हा कारणे ज्ञानाचा होईल । सुकाळ जगती ॥२०॥
त्या बोले संत प्रसन्न झाले । मग आनंदून ते म्हणाले । जे अर्जुनाने विचारले । ते सांग आम्हा ॥२१॥
गुज जे केले कृष्णार्जुनाने । ते मी अज्ञानी काय जाणे । परि तुमच्या कृपेकारणे । बोलेन मी ॥२२॥
नाही का वानरांच्या हातून । पराभूत झाला रावण । केली कौरवसेनेची धूळधाण । अर्जुनाने एकट्या ॥२३॥
जे समर्थाच्या मनी येते । येथे ते तैसेच घडते । म्हणून मजकरवी प्रकटवावे ते । गीतारहस्य ॥२४॥
भगवंत जे रहस्य वदला । तेच सांगेन मी तुम्हाला । प्राप्त होऊनी अवधानाला । ऐकावे तुम्ही ॥२५॥
वेद गौरव करतात ज्याचा । तो कृष्णच वक्ता गीतेचा । अलौकिक ठेवा ज्ञानाचा । लाभेल आता ॥२६॥
करू कैसे तयाचे वर्णन । जे शंकराही नाही होत आकलन । म्हणून करतो मी वंदन । या गीतातत्त्वा ॥२७॥
मग विश्वरूपाची आस धरून । काय बोलला तो अर्जुन । ऐका ते लक्ष देऊन । आता तुम्ही ॥२८॥
ब्रह्मच हे सर्व जगत । ऐसे आले जयाच्या प्रतितीत । ते डोळ्यांनी पाहण्याची इच्छा धरत । होता अर्जुन ॥२९॥
ही तया मनी इच्छा खूप । पडले तयासी संकट अमूप । कैसे म्हणावे दाव विश्वरूप । देवा मजला ॥३०॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आतापर्यंत बा कोणी । केलीच नव्हती अशी मागणी । हे सर्व जाणून मनी । भांबावला तो ॥३१॥
लक्ष्मी इतकी जवळची । पण हिंमत नाही झाली तिची । अनुभूति ती विश्वरूपाची । तिजलाही नाही ॥३२॥
मी देवाचा सेवेकरी । परि कैसी होईल गरुडाची बरोबरी । पाहिले का त्या गरुडाने तरी । ते विश्वरूप ॥३३॥
मी काय सनकादिकाहून जवळचा । पत्ता नसे तयां विश्वरूपाचा । सर्व समुदाय गोकुळीचा । न जाणे तया ॥३४॥
गोपिकांना बालरूपे फसविले । अंबराजासाठी गर्भवास साहिले । परि विश्वरूप ना दाविले । कोणा कधी ॥३५॥
जे कुणी न विचारले । आणि कुणाही न दाविले । ते दावावे विश्वरूप आपुले । विचारू कैसा ॥३६॥
आणि जर न विचारीन । तर विश्वरूप देखल्यावीण । माझं ते जगणं । अर्थहीन बा ॥३७॥
म्हणून आता हिंमत करून । विश्वरूप दावा म्हणीन । मग भगवंताच्या इच्छेनं । होवो काहीही ॥३८॥
ऐशा त्या तळमळीनं । विचारणा करील तो अर्जुन । मग विश्वरूप दाखवतीन । भगवंत आपुले ॥३९॥
जसे वासरू ते पाहून । गायीने खडबडून उठणं । मग पान्हा ते चोरणं । न घडे तेथे ॥४०॥
पांडवांचे रक्षण करण्याला । जो रानावनातही धावला । तो दावण्या विश्वरूपाला । हटेल कैसा ॥४१॥
भगवंत प्रेमाची मूर्ती । अर्जुन तयाचा सांगाती । मग वेगळेपणाची गोष्ट ती । उरेल कैसी ॥४२॥
अर्जुनाचिया बोलासरिसा । देव विश्वरूप झाला आपैसा । तो प्रसंग बा कैसा । ऐकावा तुम्ही ॥४३॥

अर्जुन उवाच

जे शब्दात न सामावते । ते तुम्ही बोलला येथे । मजवरील प्रेमाकारणे ते । कथिले तुम्ही ॥४४॥
जयात पंचभुते आटती । जीव ब्रह्मातील भेद संपती । ती तुझी स्वरूपस्थिती । सांगितली देवा ॥४५॥
जे मन बुद्धीस न आकळते । ऐसे लपवून ठेवले ते । द्वैती कधीही न आकळते । तू ते तत्त्व देवा ॥४६॥
जे ब्रह्मस्वरूप आपुले । ते रहस्य मजसी सांगितले । जयासाठी शंकराने त्यागिले । ऐश्वर्य सारे ॥४७॥
ते ब्रह्मज्ञान स्वामी । मजसी कथिले बा तुम्ही । कैसे एकरूप व्हावे त्या ब्रह्मी । न कळले मजला ॥४८॥
मोहरूपी या महापुरात । चाललो होतो मी वाहत । परि देवुनिया तू हात । वाचवले देवा ॥४९॥
एक त्या तुझ्यावाचून । विश्वी काहीच नाही अन्य । पण आमच्यात आहे मीपण । ठासून भरले ॥५०॥
मी जगी एक अर्जुन । ऐसा मजठायी अभिमान । आणि हे कौरव स्वजन । वाटती मजला ॥५१॥
यांना जर मी मारीन । तर मजला पाप लागेन । पाहत होतो ऐसे दु:स्वप्न । परि जागवले तू ॥५२॥
देवा गंधर्व नगराची वस्ती । सोडूनी चाललो होतो श्रीपती । तहान जाण्यासाठी ती । होतो पीत मृगजळ ॥५३॥
जे किरडू होते कापडाचे । परि लहरी येत होत्या साचे । ऐसे वाया मरत्या जिवाचे । घालवले भ्रम ॥५४॥
आपले प्रतिबिंब न जाणता । सिंह विहिरीत उडी घालत होता । तैसे वाचविले तू अनंता । मज दु:खातून ॥५५॥
एकत्र करता सात सागर । जेवढा होईल आकार । होता निश्चय तेवढा अपार । माझा भगवंता ॥५६॥
हे जगचि आघवे बुडावे । वरी आकाशही तुटोनी पडावे । परि झुंजणे न घडावे । स्वजनाशी माझे ॥५७॥
ऐसा मोह मजठायी आला । अहिंसेचा मी आग्रह धरला । परि मला मोहातून काढला । भगवंता तू ॥५८॥
नसलेल्या मला मी मानले । आणि नव्हत्याचे नाम गोत्र ठेविले । ऐसे पिसे होते लागले । पण वाचवलेस तू ॥५९॥
मागे जळत्या लाक्षागृहातून । केले होते तू देहरक्षण । आता ने जिवा उद्धारून । चैतन्याठायी ॥६०॥
दुराग्रही हिरण्याक्ष दैत्यानं । बुद्धिरुपी वसुंधरेला काखेत घालून । ठेवले होते लपवून । मोह समुद्री ॥६१॥
तेथे भगवंता तुझे कारणे । माझी बुद्धी ताळ्यावर येणे । हे दुसरे वराह होणे । पडिले तुज ॥६२॥
ऐसे उपकार अपार केले । एकी वाचा काय मी बोले । आपुले पंचप्राणही तू दिले । मजसी देवा ॥६३॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

श्रम न गेले तुझे वाया । तुला यश मिळाले देवराया । समूळ ती माया । निरसली माझी ॥६४॥
कमळे उमलावीत आनंद सरोवरात । तैसे प्रकटले ज्ञान अंतरात । तुझ्या कृपा प्रसादात । नाहलो मी ॥६५॥
आता माझी नि मोहाची गाठ । बा भलतीच ही गोष्ट । वडवानला मृगजळाची भेट । काय करी ॥६६॥
तुझ्याच आशीर्वादानं । गेलो मी ब्रह्ममय होऊन । ब्रह्मरसाचे ते अस्वादन । अंतरी माझ्या ॥६७॥
तुझ्या त्या कृपेकारण । गेला मोह सारा संपून । तुझी ती शपथ घेऊन । सांगतो देवा ॥६८॥
हे कमलनयन डोळसा । तू सूर्यकोटी तेजसा । ज्ञान तुजकडून महेशा । ऐकले आज ॥६९॥
जिच्यातून प्राणी जन्मतात । आणि तिच्यातच लयाही जातात । ती प्रकृती माझ्या पुढ्यात । सांगितली देवे ॥७०॥
प्रकृतीचे रहस्य सांगून । दाविले पुरुष ईश्वराचे मूळस्थान । जयाचा महिमा पांघरून । डोलती वेद ॥७१॥
वेदातील त्या शब्दाकारणे । धर्मपंथाचे ते जन्मणे । हे तुझिया कृपाकारणे । घडते देवा ॥७२॥
ऐसी अगाध तुझी महती । सकल मार्ग जेथे पोहचती । तू ती ब्रह्मस्वरूपस्थिती । दाविली मजला ॥७३॥
जेधवा अभ्र विरते । आकाशी सूर्यमंडळ दृष्टी पडते । वा बाजूस केल्यास शेवाळ ते ।उरे स्वच्छ पाणी ॥७४॥
सापाने चंदनासी सोडता । देता येते ती आलिंगनता । वा पिशाच्चाने पळ काढता । येई द्रव्य हाती ॥७५॥
प्रकृति ही आड होती । देवानेच बाजूस सारून ती । मग ब्रह्मतत्त्व माझिये मती । प्रकट केले ॥७६॥
म्हणून ब्रह्मतत्त्वा विषयी देवा । भरोसा पूर्ण झाला जिवा । परि आणखी एका भावा । पूर्ण करावे ॥७७॥
भीड ती धरून । जर ती मी न विचारीन । तर दुसरे आणखी कोण । सांगेन मजला ॥७८॥
जलचरानी भेव धरला जलाचा।बालक जर विरोध करी स्तनपानाचा।तर त्यांच्या जगण्याचा ।उपाय नाही ॥७९॥
म्हणून भीडभाड ती सोडतो । मज आवडते ते सांगतो । यावर उत्तरला देव तो । सांग सत्वरी ॥८०॥
मग बोलला अर्जुन । जे केले तुम्ही ब्रह्मतत्त्व कथन । मन तयाच्या त्या प्रतितीनं । निवाले माझे ॥८१॥
जयाच्या ठायी हे जग प्रकटते । आणि जयातच लोप पावते । जया म्हणती ब्रह्मतत्त्व ते । ते तूच देवा ॥८२॥
ते मुख्य तुझे रूप । जेथून प्रकटते चतुर्भुज अमूप । समूळ संपवण्या ते पाप । देवा जन्म तुझा ॥८३॥
प्रथम विष्णूचा अवतार । नंतर मत्स्य कूर्मादिप्रकार । खेळ हा सारा संपल्यावर । जे स्थान तुझे ॥८४॥
जया उपनिषदे गातात । योगी अंतरी अनुभवतात । आणि जाहले सनकादिक संत । पिसे जयासाठी ॥८५॥
ऐसे अगाध जे तुझे । विश्वरूप कानी ऐकले जे । ते पहावया चित्त माझे । उतावीळ देवा ॥८६॥
टाकून देऊन संकोचास । विचार तू म्हटलास । म्हणून माझी ती आस । सांगितली देवा ॥८७॥
तुझे विश्वरूप आघवे । माझिये दृष्टीस गोचर व्हावे । ऐसी थोर आस जिवे । बांधून आहे ॥८८॥
परि आणखी एक शारंगपाणि । शंका आहे माझे मनी । पाहू शकेन का डोळ्यांनी । मी विश्वरूप तुझे ॥८९॥
नाहीच बा मी जाणता । न ठाऊक मला ते तत्त्वत: । रोग्यास येते का कधी सांगता । निदान रोगाचे ॥९०॥
त्या तहानेच्या कारण । आपण आपली योग्यता विसरणं । मग वाटे समुद्र अपूर्ण । भागवण्या तहान ॥९१॥
मनीच्या प्रबल इच्छेने । बालक पात्रता न जाणे । परि इच्छा ती पुरविणे । मातेने जैसी ॥९२॥
तैसे तू परमेश्वरा । जाणूनी माझिया अधिकारा । दाखव विश्वरूपाचा पसारा । आता मजला ॥९३॥
माझ्या योग्यतेनुरूप करणे । पात्रता नसल्यास नाही म्हणणे ।पंचमातील त्या गायनाने ।बहिऱ्या सुख कैसे ॥९४॥
मेघाच्या त्या पावसानं । भागते चातकाची तहान । पण पाऊस खडकावर पडणं । व्यर्थ देवा ॥९५॥
चकोर सेवितसे चंद्रामृत । इतरांची काय तोंडे बांधलीत । परि दृष्टिवीण वाया असे जात । दृश्य देवा ॥९६॥
देवा भरोसा माझ्या मनी । ज्ञानी असो वा अज्ञानी । दोहोंना विश्वरूप दाऊनी । उद्धरतोस तू ॥९७॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

भगवंता तू औदार्यवान । पात्र अपात्र भेद न करुन । मोक्षाचे ते निधान । वैऱ्याही दिधले ॥९८॥
खरोखर मोक्ष दुष्प्राप्य होय । परि जोही आराधी तुझे पाय । तू धाडसी तेथे जाय । चाकरा जैसा ॥९९॥
त्या सनकादिका जैसी । मुक्ती दिलीस तू पूतनेसी । जी विष लावून स्तनासी । मारण्या आली ॥१००॥
राजसूय त्या यज्ञात । देव ऋषीच्या देखत । केले होते अपमानित । शिशुपालाने ॥१०१॥
ऐशा अपराधी शिशुपाला । स्वत:जवळी ठाव दिधला । आणि उत्तानपादाच्या बाळा । दिधले ध्रुवपद ॥१०२॥
त्याने याचसाठी तप केले । पित्याच्या मांडीवर बैसावे वाटले । परि तया श्रेष्ठपद दिले । चंद्रसूर्याहून ॥१०३॥
भक्तांसाठी धावून जाणे । तयांना संकटी रक्षणे । पुत्रा आळविता अजामिळाने । दिलास मोक्ष ॥१०४॥
भृगुने उरी जरी मारली लाथ । तयाची खूण असे तू वहात । शंखासुराची आठवण असे देत । शंख तुझा ॥१०५॥
शत्रूंवरही करसी उपकार । अपात्र ठायीच तू उदार । केलास बळीचा तू उद्धार । दान मागुनी ॥१०६॥
ना पूजिले ना गुणगान केले । त्या गणिकेसही वैकुंठी नेले । होते अंतसमयी आठवले । पोपटाला जिने ॥१०७॥
ऐसे हे सर्वजन । नेतोस तू उद्धारून । मग माझ्यासी वेगळं वागणं । घडेल कैसे ॥१०८॥
कामधेनुचं ते दुभतं । जे जगाची भूक भागवतं । तिचं वासरू कधी का राहतं । भुकेलं देवा ॥१०९॥
म्हणून मी जे विनविले काही । ते तू न दाविसी असे नाही । परि पाहण्यासाठी देई । पात्रता मज ॥११०॥
ऐसे तुला जर वाटते । कि आकळेल मजसी विश्वरूप ते । मग आताच पुरवावे ते । डोहाळे देवा ॥१११॥
ऐसी कळकळीची विनंती । जेव्हा करू लागला सुभद्रापती । मग तो षडगुण चक्रवर्ती । विव्हळ झाला ॥११२॥
येता जवळ पावसाळा । अमृतासम ढग होती गोळा । आणि गाते ती कोकिळा । येता वसंत ॥११३॥
देखोनी पौर्णिमेच्या चंद्राला । भरती येते सागराला । तैसा भगवंत उल्हासला । अर्जुनाकारणे ॥११४॥
भगवंत मग प्रसन्न झाला । आणि अर्जुनासी म्हणाला । पाहून घे तू विश्वरूपाला । अर्जुना तू ॥११५॥
एक विश्वरूप पाहीन । विचार केला होता अर्जुनानं । पण स्वयेचि विश्व होऊन । प्रकटला भगवंत ॥११६॥
भगवंत उदार अपरिमित । भक्तांची इच्छा पुरविण्यात । देतसे तो हजारपटीत । सर्वस्व आपले ॥११७॥
शेषाचे ते डोळे झाकले । आणि वेदांनाही फसविले । लक्ष्मीसही न दाविले । आपुले स्वरूप ॥११८॥
ते रूप आता प्रकटवून । देईल तो विश्वरूप दर्शन । आला भाग्याचा तो क्षण । अर्जुनासाठी ॥११९॥
झोपेत पडता ते स्वप्न । स्वप्नच बनून जातो आपण । तैसे ब्रह्मांड होतो भगवान । आपुल्याच ठायी ॥१२०॥
ते कृष्णरूप टाकून । स्थूल दृष्टीस सोडून । केले मग ते प्रकटन । विश्वरूपाचे ॥१२१॥
यासी दिसेल की नाही । त्यांची चिंता न केली काही । म्हणाला अर्जुना पाही पाही । रूप माझे ॥१२२॥

श्री भगवानुवाच

अर्जुना तू एक मागितले । आणि तेच दावले तर काय केले । पहा ब्रह्मांड ते सारे प्रकटले । माझेच ठायी ॥१२३॥
एक कृश एक स्थूल । एक ऱ्हस्व एक विशाल । एक भासे वेगळालं । एक अमर्याद ॥१२४॥
एक अनावर एक प्रांजळ । एक उद्योगी एक निश्चल । एक उदासीन एक स्नेहाळ । तीव्र एक ॥१२५॥
एक सावध एक बेसावध । एक असलग एक अगाध । एक उदार एक बद्ध । क्रुद्ध एक ॥१२६॥
एक शांत एक धुंद । एक स्तब्ध एक आनंद । एक गर्जीत एक नि:शब्द । सौम्य एक ॥१२७॥
एक लोभी एक विरक्त । एक जागृत एक निद्रिस्त । एक संतोषी एक आर्त । प्रसन्न एक ॥१२८॥
एक नि:शस्त्र एक सशस्त्र । एक रौद्र एक मित्र । एक भयानक एक विचित्र । समाधिस्थ एक ॥१२९॥
एक मग्न लीला विलासात । एक लालनपालनात । एक क्रोध संहारात । एक साक्षीभूत ॥१३०॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे नाना प्रकार । दिव्य तेज आणि आकार । असती रंग ते अपार । या ब्रह्मांडी ॥१३१॥
एक तावलेलं सोनं । एक पिंगट तो वर्ण । एक त्या शेंदरासमान । रंग आहे ॥१३२॥
एक सुंदर सीमित । एक ब्रह्मांड अमर्यादित । एक जसा अरुणोदय समयात । कुंकुम वर्ण ॥१३३॥
एक शुद्ध स्फटिक सोज्वळ । एक इंद्रमणी सुनील । एक अंजनवर्ण सकल । एक रक्तवर्ण ॥१३४॥
एक सोन्यासम पिवळी । एक ढगासम श्यामळी । एक सुंदर चाफेकळी । हिरवी एक ॥१३५॥
एक तप्त ताम्र तांबडी । एक शुभ्रचंद्र चोखडी । ऐसी नानावर्णे रुपडी । देख माझी ॥१३६॥
ऐसे अनेक प्रकारचे वर्ण । आणि आकारही ते भिन्न । मदनाही येणे पडे शरण । सुंदरता ऐसी ॥१३७॥
एक बांधेसूद लावण्यवती । एकीची मनोहर कांती । जैसी शृंगार भांडारे ती । उघडली आहे ॥१३८॥
एक पुष्ट मांसाळ । एक किडकिडीत विक्राळ । एक उंचमान नाठाळ । विकट एक ॥१३९॥
ऐशा नानाविध आकृती । जया अंत नाही सुभद्रापती । ऐशा विविध अंगाप्रति । भास जगताचा ॥१४०॥
होता दिठीचे उन्मीलन । तेथे घडते सृष्टीचे निर्माण । आणि दिठी ती निमाल्यानं । पावे लय सृष्टी ॥१४१॥
वदनीच्या त्या वाफेसवे । होते ज्वालामय आघवे । प्रकटे त्या ज्वालेसवे । समूह वसूंचा ॥१४२॥
आणि भुवयांचे शेवट । क्रोध मिळो पाहती एकवट । तेथे रुद्रगणांचा थाट । अवतरे अर्जुना ॥१४३॥
माझ्या बा सौम्यतेपासून । असंख्य होती देव अश्विन । आणि त्या कानाकारणं । निर्मिती वायुंची ॥१४४॥
ऐसी एकेका अवयवापासून । होती असंख्य कुळे उत्पन्न । रंग आकार ते भिन्न । असती जयाचे ॥१४५॥
यासी शोधण्या आयुष्य थोकडे । आणि वर्णण्या वेद बोबडे । ब्रह्मदेवाही न सापडे । ठाव जयाचा ॥१४६॥
जी नाही ऐकली तिन्ही वेदांनी । पहा रुपे ती या ठिकाणी । आणि भोग तू कौतुकानी । हे आश्चर्य मोठे ॥१४७॥
या विश्वरूपाच्या रोमरोमांत । पहा सृष्टी होत असते निर्मित । जैसे वनी वृक्षतळात । उगवती तृणांकुर ॥१४८॥
वादळाच्या त्या वाऱ्यात । अणुपरमाणु जसे उडतात । तैसी दिसती ब्रह्मांडे फिरत । सांध्यांमाजी ॥१४९॥
विश्वरूपाच्या एका भागात । अनेक विश्व असती वसत । त्याहीपलीकडे विस्तारतात । सीमा माझ्या ॥१५०॥
जे पहायचे असेल काही । आता सर्वथा अडचण नाही । तुला आवडे ते माझीया देही । पहावे तू ॥१५१॥
ऐसे बोलला भगवान । दया अर्जुनाची येऊन । घेत आहेस ना दर्शन । विचारले त्याने ॥१५२॥
हा शांत का राहिला । भगवंताला प्रश्न पडला । अर्जुना बोध काही न घडला । ओळखले त्याने ॥१५३॥
विश्वरूप ते दाखवूनही । याला दिसलेच नाही काही । मुखी आनंदाचे चिन्ह काही । आढळेच ना ॥१५४॥
हे पाहून देव हासला । मग अर्जुनाला म्हणाला । दाविले मी विश्वरूपाला । परि तुला दिसले नाही ॥१५५॥
यावर विचारले अर्जुनाने । हा दोष कोणाचा मानणे । तुम्ही बगळ्यासी चांदणे । घातले खाऊ ॥१५६॥
स्वच्छ पुसून आरशाला । तुम्ही तो दाविला आंधळ्याला । आणि गाणे ऐकविले बहिऱ्याला । भगवंता तुम्ही ॥१५७॥
पुष्पपरागाचा तो चारा । तुम्ही खाऊ घातला दर्दुरा । आणि उगाच तुम्ही शारंगधरा । रागवता आता ॥१५८॥
जे मनइंद्रियातीत असते । केवळ ज्ञानदृष्टीस दिसते । माझ्या चर्मचक्षूस ते । दिसेल कैसे ॥१५९॥
तुमची ती चूक काढणे । त्यापरि उचित गप्प रहाणे । बा आहे खरे तुझे म्हणणे । उत्तरला देव ॥१६०॥
तुला दिव्यचक्षु न देता । आम्ही प्रकटविली विश्वरूपता । आम्ही बोलता बोलता । विसरून गेलो ॥१६१॥
मशागत न करता पेरणे । तेथे कैसे पिकाचे प्राप्त होणे । तैसे तुजसी दिव्यदृष्टी देणे । आवश्यक होते ॥१६२॥
त्या दिव्यदृष्टीच्या मदतीने । आता विश्वरूपास ते पहाणे । आणि घडेल बघ ते अनुभवणे । आत्मतत्त्वाचे ॥१६३॥
वेद जयाचे गुण गाती । जो विश्वाच्या आदि आणि अंती । बोलला तो श्रीपती । ऐसा अर्जुना ॥१६४॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

## संजय उवाच

मग राजास म्हटलं संजयानं । राजा पहा ते नवलपण । लक्ष्मीहून का कोणी भाग्यवान । जगती आहे ॥१६५॥
करण्या आत्मतत्त्वाचे वर्णन । नाही योग्य कोणी वेदांहून । जैसे पहा श्रेष्ठ सेवकपण । शेषाठायी ॥१६६॥
पहा अपरिमित कष्ट घेणे । आठही प्रहर योगीयाचे जागणे । तैसे ती सेवा करणे । गरुडानेच ॥१६७॥
परि हे सर्व बाजूस राहिले । या पांडवासी प्राप्त झाले । पहा भगवंताने यासी दिधले । आत्मसुख ॥१६८॥
पण या पाचही पांडवांत । भगवंत अर्जुनाच्याच कह्यात । जसा लंपट असे धावत । सुंदरी मागे ॥१६९॥
पढविले पाखरू ऐसे न बोले । पाळलेले हरिण तैसे न चाले । पहा भगवंत कैसे नादी लागले । अर्जुनाच्या ॥१७०॥
परब्रह्माचा तो सोहळा । याने भोगिला आपुलिया डोळा । याचा पहा कसा लागला लळा । भगवंतासी ॥१७१॥
याचा राग सहन करतात । रुसला तर त्यास समजवतात ।पहा पडला अर्जुनाच्या प्रेमात । भगवंत कसा ॥१७२॥
जयांनी विषया होते जिंकले । ते शुकादिकांचे काफिले । तयांनीच विषय विलास वर्णिले । भगवंताचे ॥१७३॥
जो योगीयांचे समाधि धन । तो जाहला पार्थाच्या अधीन । पहा आर्श्चयाने माझे मन । चकित आहे ॥१७४॥
पण यात नवल ते कसले । जयासी भगवंताने स्वीकारले । तयाचे पहा भाग्य उजडले । आपोआप ॥१७५॥
मग भगवंत तो म्हणाला । दिव्यदृष्टी देतो बघ तुजला । मग पाहशील त्या विश्वरूपाला । अर्जुना तू ॥१७६॥
ऐसी ती अक्षरे । निघता भगवंत मुखातून एकसरे । मग अविद्येचे ते अंधारे । फिटू लागले ॥१७७॥
ती केवळ अक्षरे नव्हती । होती ती लावली ब्रह्मज्योती । अर्जुना येण्या ती प्रचीती । विश्वरूपाची ॥१७८॥
मग दिव्य प्रकाश प्रकटला । अर्जुन ज्ञानदृष्टी पावला । आणि मग पाहता झाला । त्या विश्वरूपा ॥१७९॥
जैसे सूर्यकिरणांचे कारणे । घडे मृगजळाचे भासणे । तैसे विश्वाचे हे प्रकटणे । मृगजळच की ॥१८०॥
ज्या तत्त्वाच्या कारण । घडे विश्वाचे ते प्रकटन । ते दाविले पहा आपणहून । अर्जुना त्याने ॥१८१॥
मागे एकदा बालपणी । माती खाल्ली होती श्रीकृष्णानी । तेव्हा मग राग येऊनि । यशोदे धरिला ॥१८२॥
मग मुख ते उघडून । दाविली होती चौदाही भुवन । ऐसा आहे हा भगवान । विस्मयकारी ॥१८३॥
मधुवनी ध्रुवास प्रसन्न झाला । गाला शंख तो ऐसा लावला । तेव्हा तो बोलू लागला । जे न जाणती वेद ॥१८४॥
तैसा अनुग्रह पहा राया । श्रीहरी केला धनंजया । आता जराशीही ती माया । राहिली नाही ॥१८५॥
ऐसे एकसरे एकत्व प्रकटले । सर्व विश्वचि ब्रह्म झाले । चित्त तयाचे बुडोनि गेले । ब्रह्ममयतेत ॥१८६॥
जैसा त्या ब्रह्ममयतेत ।ऋषी मार्कंडेय होता पोहत । तैसा त्या विश्वरूपात । विरघळला अर्जुन ॥१८७॥
म्हणे केवढे गगन एथ होते । ते कवणे नेले पा केऊते । ती चराचर महाभुते । काय झाली ॥१८८॥
दिशांचे भान हारपले । वरती खाली न उमजले । जैसे स्वप्नीचे भास गेले । जाग येता ॥१८९॥
सूर्याच्या त्या प्रकाशात । जसे चंद्र तारे अदृश्य पावतात । तैसे त्या विश्वरूपात । विरघळले सारे ॥१९०॥
तेथे मनाचे मनपण संपले । आणि बुद्धिचेही काही न चाले । आणि इंद्रिय ती विसरले । इंद्रियपण त्यांचे ॥१९१॥
तेथे स्तब्धतेस स्तब्धता आली । एकाग्रतेत एकाग्रता एकवटली । आणि विचारांची झाली । सांगता तेथे ॥१९२॥
तैसे विस्मित ते होऊन । चतुर्भजरूप पाहिलं अर्जुनानं । जे अनेक रूप घेऊन । होतं प्रकटलं ॥१९३॥
जैसे त्या पावसाळ्यात । वा त्या महाप्रलयात । सर्वत्र पाणीच पाणी असतं । चोहीकडे ॥१९४॥
तैसे होता विश्वरूपाचे ते ज्ञान । स्तब्ध जाहला अर्जुन । मग उघडून ते लोचन । पाहू लागे ॥१९५॥
याच दोन्ही त्या डोळ्यांनी । घ्यावे विश्वरूप पाहूनी । ही आस होती जी मनी । पूर्ण केली भगवंते ॥१९६॥
तेथे अनेक होती वदने । जैसी रमानायकाची राजभुवने । होती प्रकटली नाना विधाने । महालक्ष्मीची ॥१९७॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

आनंदाचे वन बहरले। जैसे सौंदर्याचे राज्य जोडले। तैसे अर्जुनाने पाहिले। हरीचे मुख ॥१९८॥
शब्दी न ये जयाचे वर्णन। ऐसी भयंकर ती वदनं। काळरात्रीचे सैन्य। उसळले जसे ॥१९९॥
जशी मृत्यूची तोंडे उघडली। वा भयाची दुर्गे उभारली। जशी महाकुंडे प्रकटली। प्रलयाग्नीची ॥२००॥
तेथे भयंकर अद्‌भुत। तोंडे पाहिली ती बहुत। विलक्षण विक्राळ त्या विश्वरूपात। अर्जुनाने ॥२०१॥
ज्ञानदृष्टीने पाहिले वदनांना। परि तयाचा अंत लागेना। म्हणून पाहू लागला लोचना। कौतुकाने ॥२०२॥
अनेक रंगाची कमलवने। तेथे पाहिली तयाने। नेत्र भासले अग्नीप्रमाणे। अर्जुना तेथे ॥२०३॥
आकाशी कृष्ण मेघ दाटले। नि विजांनी तांडव मांडले। तसे पिंगट दृष्टिकिरण प्रकटले। भुवयांखाली ॥२०४॥
ऐसे आश्चर्याने पहात असता। एकाच रुपात त्या पांडुसुता। एकत्वातील ती अनेकता। अनुभवा आली ॥२०५॥
मग म्हणे कोठे ते चरण। आणि कोठे ते भुजांचं असणं। असे कुतुहूल ते वाढून। शोधता झाला ॥२०६॥
अर्जुन होता भाग्यवंत। पूर्ण जाहले तयाचे मनोरथ। कधी पाहिले का शिवाच्या भात्यात। बाण फुसके ॥२०७॥
शब्द जे ब्रह्मदेवाने उच्चारिले। ते कधी काय खोटे झाले। म्हणून तयाने अपारपण देखिले। भगवंताचे ॥२०८॥
जे वेदासही न आकळे। ते सकल अवयव एकेचि वेळे। अर्जुनाचे दोन्ही डोळे। पाहते जाहले ॥२०९॥
चरणापासून मुकुटापर्यंत। नाना रत्न अलंकारांचा थाट। सर्वांगी होता मिरवत। भगवंत आपुल्या ॥२१०॥
ते परब्रह्म जे अपार। तेच जाहले पहा अलंकार। आणि आपुल्याच त्या अंगावर। मिरवू लागले ॥२११॥
जो आपल्या प्रभेकारण। उजळतसे सारे तारांगण। संपूर्ण विश्वाचे ते प्रकटन। ज्याच्याठायी ॥२१२॥
आपुले आपल्याठायी प्रकटन।वेदांही नाही ज्याचे आकलन।देवाचं स्वत:चं विश्व होणं।पाहिलं अर्जुनाने ॥२१३॥
मम आपल्या दिव्यदृष्टीने। ते लांब हात पाहिले अर्जुनाने। भयंकर शस्त्रांचं तळपणे। होते तेथे ॥२१४॥
आपणच अंग नि अलंकार।आपणच हात नि हत्यार।आपणच जीव नि शरीर।सर्व चराचर देवचि झाला ॥२१५॥
हत्यारातून निघाली किरणे। नक्षत्रांचे जाहले फुटाणे। भाजल्याकारणे अग्नि म्हणे। समुद्र कोठे ॥२१६॥
जसे काळकुटाचे वादळ उठले। नि विजांनी तांडव मांडले। तैसे असंख्य कर देखिले। शस्त्रयुक्त ॥२१७॥
मग घाबरून दृष्टीसी काढिले। आणि कंठ मुकुटासी पाहिले। कल्पवृक्ष होते निर्माण झाले। ज्यापासून ॥२१८॥
महासिद्धिंची मूळपीठे। जेथे स्वत: लक्ष्मी विसावा घेते। तेथे सुंदर फुलांची ताटे। देखिली तयाने ॥२१९॥
फुलांचे घोस मुकुटावर। आणि अनेक पूजा मस्तकावर। गळ्यात ते सुंदर हार। होते तेथे ॥२२०॥
स्वर्गास सूर्यतेजाने वेढावे।वा मेरू पर्वतास सोन्याने मढवावे।तैसे नितंबावर ओढिले देवे।पीतांबर सुंदर ॥२२१॥
शंकरा कापूर उटी लावणे। कैलासा पाऱ्याने सजवणे। वा क्षीरसागरा शुभ्रवस्त्र घालणे। तैसेच सारे ॥२२२॥
चंद्रम्याची घडी उलगडली। नि आकाशा खोळ घातली। तैशी चंदन उटी देखिली। सर्वांगी तेणे ॥२२३॥
जयाने स्वप्रकाशा चढे कांती। ब्रह्मानंदाची होय प्राप्ती।पृथ्वीसी लाभते चैतन्यता ती।होता सुगंध ऐसा ॥२२४॥
जयाचे लेप संन्यासी लावती। जो मदनाचाही सोबती। तयाची थोरवी ती। काय वर्णू ॥२२५॥
पाहता ऐशा त्या शृंगाराला। अर्जुन मनी भांबावला। देव उभा की बैसला। हे न उमजले तया ॥२२६॥
बाहेर ते पाहता। होते सर्व देवमय तत्त्वत:। आणि अंतर्मुख ते होता। आतही तैसे ॥२२७॥
अपार ती मुखे पाहून। घाबरून पाठमोरा झाला अर्जुन। सर्वत्र श्रीमुख आणि कर चरण। दिसली त्यासी ॥२२८॥
उघड्या डोळ्यांनी ते दिसे। यात काय नवल असे। परि डोळे मिटताही आभासे। अंतरंगी ते ॥२२९॥
पहा त्या अनुग्रहाचं होणं। पार्थाचं पाहणं आणि न पाहणं। सर्वत्र होता तो नारायण। अंतर्बाह्य ॥२३०॥
ऐसा आश्चर्यचकित होऊन। दिपून गेला तो अर्जुन। चमत्कार ते पाहून। स्तब्ध झाला ॥२३१॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे त्या भगवंतानं । देऊन आत बाहेर दर्शन । आपले विश्वव्यापकपण । दाविले अर्जुना ॥२३२॥
विश्वरूपाचं ते दर्शन । मागितलं होतं अर्जुनानं । म्हणून भगवंत विश्व होऊन । प्रकटला तेथे ॥२३३॥
प्रकाश असता ते दिसणे । नि अंधार होता लोप पावणे । तैसे नव्हते ते पाहणे । जे लाभले अर्जुना ॥२३४॥
ऐसी दिव्यदृष्टी लाभून । पहात होता तो अर्जुन । असे सांगितलं संजयानं । धृतराष्ट्राला ॥२३५॥
म्हणे राजा तुला का समजले । अर्जुनाने विश्वरूप देखिले । पहा तयाने ते अनुभवले । अंतर्बाह्य ॥२३६॥
त्या अंगकांतीचा देवा । नवलावो काय सांगावा । कल्पांतीचा जसा मेळावा । बारा आदित्यांचा ॥२३७॥
जैसे दिव्य सूर्य सहस्त्रावरी । ते उगवले एकेचि अवसरी । तयांच्या तेजाची ती थोरी । काय सांगू ॥२३८॥
अवघ्या विजा त्या मिळवून । त्यात कल्पांतीचा अग्नि टाकून । महातेजाचे केले कालवण । जसे तेथे ॥२३९॥
कितीही केले तयाचे वर्णन । तरी आहेच ते अपूर्ण । कशानेही तयाची बरोबरी करणं । अशक्य राजा ॥२४०॥
ऐसे ते विश्वरूप दर्शन । जे भगवंताचे विश्वव्यापकपण । ते श्री व्यासांच्या कृपेनं । लाभले मज ॥२४१॥
त्या प्रचंड विश्वरूपात । पहा निरनिराळे जगं दिसतात । बुडबुडे जसे समुद्रात । दिसती निराळे ॥२४२॥
आकाशी जसे गंधर्वनगर । वा मुंगीचे वारूळ जमिनीवर । सूक्ष्म परमाणू मेरूवर । बैसले जैसे ॥२४३॥
ऐशा त्या विश्वरूपात । कित्येक ब्रह्मांड होती वसत । आणि अर्जुन होता पहात । लोचनांनी आपुल्या ॥२४४॥
मी निराळा विश्वाहून । हे अंतरी जे होते द्वैतपण । ते गेले पहा आटून । अनुभूती येता ॥२४५॥
आत आनंद प्रकटला । विचार स्तब्ध जाहला । आणि अर्जुन रोमांचित झाला । अपादमस्तक ॥२४६॥
वर्षा ऋतूच्या त्या हंगामात । पर्वत जसे हिरवेगार होतात । तसे झाले रोमांचित । शरीर त्याचे ॥२४७॥
होता चंद्रकिरणांचा स्पर्श तो । जसा मणि चंद्रकांत पाझरतो । तैसा रोमांच उठतो । शरीरावर त्याच्या ॥२४८॥
अडकलेल्या भ्रमराचेकारणे । जसे कमलकलिकेचे डोलणे । तैसे तयाचे शरीर ऊर्मीने । थरथरत होते ॥२४९॥
घडता कर्पूरकर्दळीचे भेटणं । गळती कापुराचे कणं तैसे डोळ्यातून अश्रूंचं पाझरणं । घडले तेथे ॥२५०॥
चंद्राचे जेव्हा उगवणे घडते । तेव्हा समुद्रासी भरती येते । तैसे घडले उचंबळणे ते । अर्जुनाच्या ठायी ॥२५१॥
जशी अष्टसात्त्विक भावात । चढाओढ लागली आपसात । तैसा ब्रह्मानंद होता प्रकटत । हृदयी त्याच्या ॥२५२॥
ऐसा अनुभव अनुभवत । द्वैताचा सांभाळ करत । उसासे होता टाकीत । अर्जुन तेथे ॥२५३॥
मग देवाकडे पाहून । हात ते जोडून । अर्जुन करत ते नमन । बोलता झाला ॥२५४॥
म्हणे जयजया श्रीस्वामी । केली नवलकृपा तुम्ही । जे हे विश्वरूप आम्ही । देखत आहो ॥२५५॥
तूच या सृष्टीचे आश्रयस्थान । प्रत्यक्ष पाहिलं मी डोळ्यानं । आणि गेलो पहा भांबावून । अंतर्बाह्य ॥२५६॥
जसे त्या मंदारपर्वतावर । असतात ती वनचर । तशी पाहिली तुझ्या शरीरावर । भुवने चौदाही ॥२५७॥
जसे त्या आकाशात । तारकांचे समूह फिरतात । वा महावृक्षी घरटी असतात । पक्ष्यांची जशी ॥२५८॥
तैसे पहा श्रीहरी । तुझ्या या विश्वात्मक शरीरी । त्या इंद्रादिकांची स्वारी । वास करते ॥२५९॥
प्रभु महाभुतांचे पंचक । येथे देखत आहे अनेक । आणि भूतग्राम कित्येक । भूतसृष्टीचे ॥२६०॥
पाहिला तो सत्यलोकाचा ठाव । आणि देखिला पहा ब्रह्मदेव । आणि त्या कैलासाचे गाव । आहे तेथे ॥२६१॥
श्री महादेव पार्वतीनिशी । पहा दिसे एका अंशी । आणि तू भगवंत हृषीकेशी । दिसे मजला ॥२६२॥
पाहिली कश्यपादि ऋषीकुळे । इये तुझीया स्वरुपी सकळे । आणि ती सप्तपाताळे । सर्पकुळासह ॥२६३॥
किंबहुना हे त्रैलोक्यपती । तुझ्या एकेका अवयवाप्रति । चौदाही भुवनांची आकृती । चितारली आहे ॥२६४॥
आणि तेथे त्या भुवनात । अनेक लोक आढळतात । स्वरूप तुझे वर्णनातीत । अनुभवा आले ॥२६५॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

दिव्य चक्षूचा घेऊन आधार । जेव्हा टाकली मी नजर । तेव्हा सर्वत्र आकाशाला कर । आढळले जैसे ॥२६६॥
पहा एकेक ते निरंतर । देवा देखतसे तुझे कर । पहा जे करताती व्यापार । ऐकचि वेळी ॥२६७॥
घेऊन महाशून्याचा आधार । उघडली ब्रह्मांडाची भांडार । तैसी देखतसे अपार । उदरे तुझी ॥२६८॥
सहस्त्रावधी मस्तकांचे मेळे । कोटीवरी होत जात एकवेळे । तैसी परब्रह्म वदनफळे । पाहिली तेथे ॥२६९॥
सर्व पहा मुखे ती । तुझी देखतसे विश्वमूर्ती । आणि अनेक त्या नेत्रपंक्ती । सर्वदूर ॥२७०॥
हे असो स्वर्ग पाताळ । की भूमी दिशा अंतराळ । भेदाची भाषा ती सकळ । संपून गेली ॥२७१॥
भगवंता तुझ्यावीण । दिसतो का एखादा कण । पाहीलं मी शोधून । पण व्यर्थ देवा ॥२७२॥
जे जे अनुभवा येते । ते ते भगवंता तूच असते । ऐसे या संपूर्ण विश्वाते । व्यापिले तूच ॥२७३॥
कोठून तू आलास । तू बसला की उभा आहेस । कोणाच्या पोटी जन्मलास । भगवंता तू ॥२७४॥
तुझे रूप वय कैसे । तुज पलीकडे काय असे । कोठुनी तू आलासे । शोधिले मिया ॥२७५॥
जेव्हा पाहिले डोळे उघडून । अनुभवा आलं ते अनंतपण । तू नसे कोणाचा कोण । अनादि आयता ॥२७६॥
तू उभा ना बैठा । उंच ना खुजटा । खाली वर आणि वैकुंठा । तूच अससी ॥२७७॥
सर्व त्या रूपात । देवा तूच असे वसत । भगवंता तुजवीण अस्तित्व । नाही कोठे ॥२७८॥
किंबहुना बा आता । जे दिसे ते तूच अनंता । हे पुढती पुढती पाहता । देखिले मिया ॥२७९॥
पण तुझ्या या रूपात । एक उणीव मी असे देखत । तुजठायी आदि मध्य अंत । नाही कोठे ॥२८०॥
तुझ्या या विश्वरूपात । शोध घेतला मी सर्वत्र । तुझा आदि मध्य अंत । सापडला नाही ॥२८१॥
ऐसा आदि मध्य अंतरहिता । भगवंता तू अपरिमिता । अनुभवले मी तत्त्वत: । तुझ्या विश्वरूपास ॥२८२॥
ऐशा त्या महामूर्तीत । अनेक अनेक मूर्ती असतात । सारी ब्रह्मांड ती फिरतात । तुझिया ठायी ॥२८३॥
तुझ्या त्या पृथक् मूर्तीत । पहा वेली अनेक असतात । ज्या सदैव लगडतात । फळाफुलांनी ॥२८४॥
देवा जसा तू महासागर । तुजठायी ब्रह्मांडरूपी तरंगांचा वावर । भगवंता तू वृक्ष अपार । संसाररूपी ॥२८५॥
जे भुती भूतळ मांडिले । जैसे नक्षत्री गगन व्यापले । तैसे मूर्तीनी पहा भरले । रूप तुझे ॥२८६॥
देवा तुझिया अंगाप्रति । त्रिभुवने होत जात असती । दिसती अनंत त्या मूर्ती । तुझ्या रोमारोमांत ॥२८७॥
ऐसा विस्तार मांडला विश्वाचा । तू एथ कोण बा कोणाचा । हे पाहिले तव आमुचा । सारथी तू ॥२८८॥
भगवंता तू मनोहर । अनंत व्यापक आणि अपार । परि भक्तांसाठी रूप मधुर । धरले तुवा ॥२८९॥
कैसे करू तव भुजांचे वर्णन । पाहता निवती डोळे आणि मन । मिठी ती देऊन । बैसावे वाटे ॥२९०॥
ऐसी मूर्ती सुंदर झालास । कृपा आमच्यावर करण्यास । तुझ्या त्या विश्वरूपास । तोड नाही ॥२९१॥
त्या दिव्यदृष्टीने पाहिले । म्हणूनच तुझे विश्वरूप दिसले । अन्यथा होते गोंधळलेले । मन माझे ॥२९२॥
रथाचा जरी सारथी होता । मी पाहिली तुझी विश्वव्यापकता । तुझी अपार ती अनंतता । ओळखली मी ॥२९३॥
पूर्वीचाच मुकुट शिरी । लेईलासी तू श्रीहरी । परि आताचे तेज आणि थोरी । न्यारीच भगवंता ॥२९४॥
वरच्या त्या हातात । चक्र असे फिरत । असे आपुली खूण तू दावित । विश्वरूपातही ॥२९५॥
घेऊनी गदा दुसऱ्या हातात । शस्त्रहीन खालचे दोन्ही हात । पहा कसे सरसावतात । धरण्या लगाम ॥२९६॥
माझ्याच इच्छेकारण । जुन्या खुणा त्या घेऊन । विश्वरूप ते होऊन । प्रकटला तुम्ही ॥२९७॥
कसे करू तुझे वर्णन । मजसी आता न कशाचे भान । माझे चित्त गेले असे गोंधळून । भगवंता आता ॥२९८॥
हे दृश्य खरे असेल का । माझ्या मनी येतेसे शंका । तुझ्या विश्वरूपाचा आवाका । न कळे मज ॥२९९॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

येथे अग्नीचीही दृष्टी करपणे । सूर्य काजव्याप्रमाणे भासणे । विश्वरूपाचे ते चमकणे । अद्‌भुत देवा ॥३००॥
महातेजाच्या सागरी । बुडोनि गेली सृष्टी सारी । जशी येता प्रलयाची बारी । विजा झाकती गगन ॥३०१॥
कालवून प्रलयकालीच्या ज्वाळा । जसे मचाण बांधले अंतराळा । आता दिव्य ज्ञानाच्याही डोळा । पाहवेना ॥३०२॥
अतिप्रखर तो प्रकाश । जसे शेकडो सूर्य आले उदयास । पहा दिव्य चक्षुंनाही त्रास । होत असे ॥३०३॥
तो महाप्रलयीचा अग्नी । लपला होता शंकराच्या तृतीय नयनी । तोच आता प्रकटूनी । बाहेर आला ॥३०४॥
साम्राज्य पसरले प्रकाशाचे । जसे तांडवनृत्य अग्नीचे । झाले कोळसे ब्रह्मांडाचे । त्या अग्नीमाजी ॥३०५॥
काय तेज हे अद्‌भुत । प्रथमच आहे मी पहात । सीमाच नसे दिसत । तुझिया तेजा ॥३०६॥
भगवंता तू अक्षर । त्या ओंकाराच्याही पार । वेद बा जयाचे घर । शोधीत असती ॥३०७॥
जेथून प्रकटतो आकार । ऐसा तू निराकार । अनंत आणि अपार । स्वरूप तुझे ॥३०८॥
तू धर्माचा वोलावा । अनादिसिद्ध नित्य नवा । जाणे मी सदतिसावा । पुरुष तू ॥३०९॥
तू अदि मध्य अंतरहित । तू अपार नि अनंत । व्यापक ऐसे सीमारहित । स्वरूप तुझे ॥३१०॥
तू विरोधी शक्तींचे भांडार । तुजठायी चंद्र सूर्याचा वावर । कोपतोस तू तमावर । आणि कृपा सत्त्वाठायी ॥३११॥
मी देखतसे तुला । आणि तुझिया त्या स्वरूपाला । जैसा प्रलयाग्नी पेटला । तैसे मुख तुझे ॥३१२॥
जसे वणव्याने पेटती पर्वत । तैशा ज्वाला असती उठत । आहे दाढा दात चाटत । जीभ तुझी ॥३१३॥
त्या मुखातील अग्नीकारणे । आणि सर्वांगीच्या प्रभेने । विश्वास ते पोळणे । लागत आहे ॥३१४॥
ते देवलोक आणि पाताळ । पृथ्वी आणि अंतराळ । पहा त्या दाही दिशा सकळ । व्यापिल्या तुम्ही ॥३१५॥
भरला आहेस तू सर्व ठिकाणी । पाताळ धरती आणि गगनी । सर्व विश्व तुझ्यात सामावूनी । घेतलेस ॥३१६॥
प्रकटवून तो अद्‌भुतरस । गुंडाळीले तू चौदाही भुवनास । पारावार माझ्या आश्चर्यास । नाही आता ॥३१७॥
भगवंता तुझी व्याप्ती असाधारण । मज न साहवे तुझे उग्रपण । झाले बघ माझे प्राण । कासावीस ॥३१८॥
देवा ऐसे देखोनी तूते । आले पहा ते भयाचे भरते । आहे दु:ख कल्लोळात बुडत ते । तिन्ही भुवने ॥३१९॥
भगवंता तुझ्या दर्शनात । मज भय का आहे वाटत । सुखाचा अभाव आहे जाणवत । रुपात तुझ्या ॥३२०॥
जोवरी तुझे रूप नव्हते देखिले । तोवरीच विषय गोड वाटले ।पण आता मन माझे विटले ।विषयांना आज ॥३२१॥
आता रूप तुझे पाहून । कशी मिठी घालता येईन । आणि तुला मिठी दिल्यावीण । सुख कैसे ॥३२२॥
मी मागे सरावे तर । दिसतो हा दु:खसंसार । आणि पुढ्यात तू अतर्क्य अपार । पहा गोंधळलो मी ॥३२३॥
कैसा सापडलो संकटात । विश्वाचाच हुरडा असे होत । आता करू काय मी तात । सांग मजला ॥३२४॥
जसे आगीत जाता होरपळून । जावे समुद्राकडे धावून । आणि प्रचंड त्या लाटा पाहून । उपजे भीति ॥३२५॥
तैसेच या जगाचे झाले । जीव घाबरून या तीरीच राहिले । आणि फक्त ज्ञानीच गेले । पैलतीरा ॥३२६॥
जीवभाव तो सोडून । सर्व कर्मे ती जाळून । पहा गेले निर्गुणात एकरूप होऊन । ते भक्त ज्ञानी ॥३२७॥
आणि जे गेले घाबरून । ते प्रार्थती दोन्ही हात जोडून । आणि द्वैतात त्या अडकून । करती द्वैत भक्ती ॥३२८॥
म्हणती अविद्येत आम्ही पडलो । विषय जाळ्यात फसलो । स्वर्ग संसारात अडकलो । अज्ञानीपणे ॥३२९॥
आता कोण तुजवाचून । यातून आम्हास सोडवीन । ऐसे म्हणत येती शरण । तुजला देवा ॥३३०॥
आणि महर्षी अथवा सिद्ध । पंडित समूह विविध । घोषात उच्चारती ते वेद । स्तवनालागी ॥३३१॥
रुद्र आदित्याचे मेळावे । अष्ट वसु ते आघवे । अश्विन वायू वैभवे । प्रार्थती तुज ॥३३२॥
तैसे पितर आणि गंधर्व । यक्ष राक्षस गण सर्व । ज्यात मुख्य इंद्र देव । दिसती मजला ॥३३३॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

हे आघवेचि आपुलिया लोकी । उत्कंठीत होऊनी अवलोकी । तुझी महामूर्ती दैविकी । पाहती पहा ॥३३४॥
मग पाहत प्रतिक्षणी । विस्मित होऊनी अंत:करणी । निज मस्तकाची ओवाळणी । करती तुजला ॥३३५॥
ते जयजयकार करत । अवघ्या स्वर्गास गाजवत । कपाळी दोन्ही कर ठेवत । नमस्कारती तुजला ॥३३६॥
ऐसे शरण तुज येता । सात्त्विक भाव प्रकटता । मन बुद्धिचा लय होता । प्राप्ती तुझी ॥३३७॥
पहा भाग्य ते लोचनांचे । मनी सुकळ जाहले सुखाचे । दर्शन जे विश्वरूपाचे । घडले मज ॥३३८॥
जयाने त्रैलोक्या व्यापिले । देवगंधर्वाही जे न लाभले । पहा तयाचे दर्शन घडले । मज पामराला ॥३३९॥
सारे रूपच ते विचित्र । दिसती अति भयानक ती नेत्र । कर असती पहा सशस्त्र । अनंत अनंत ॥३४०॥
अनंत सुंदर बाहु चरण । बहु उदरे आणि नानावर्ण । कैसे प्रकटले आवेशपण । वदनी पहा ॥३४१॥
कल्पांतीची वेळ येता । आणि यमाचा तो पारा चढता । सर्वत्र प्रलयाग्नीची सत्ता । दिसतसे मग ॥३४२॥
जैसे महेशासी संताप येता । प्रलयाची वेळ प्रकटता । भूतमात्रांची ती सत्ता । नष्ट होई ॥३४३॥
तैसे पाहता चोहीकडे । दिसती प्रचंड तुझी मुखडे । जैसे दरीत सिंह गर्जे ओरडे । संताप येता ॥३४४॥
अमावास्येच्या त्या काले । जसे अंधारी भूतखेते बाहेर निघाले । आणि रक्ताने पहा माखले । मुख तुझे ॥३४५॥
काळास देऊन आमंत्रण । जसे रणी मातले मरण । तैसे ते अतिभयंकरपण । वदनी तुझ्या ॥३४६॥
ही बापडी लोकसृष्टी । तुवा किंचित टाकली दृष्टी । आणि ती दु:ख सरितेच्या तटी । करपून गेली ॥३४७॥
मृत्यूच्या त्या महासागरात । जिवांची नौका आहे हिंदोळत । अंती बुडते शोक दु:खात । अज्ञानापायी ॥३४८॥
कदाचित राग तो येऊन । तू म्हणशील पहा भगवान । तयांशी काय तुज घेणं-देणं । आहे अर्जुना ॥३४९॥
खरंच आहे तुझं म्हणणं । पण त्या लोकांना ढाल करून । वाचवू पाहे मी माझा प्राण । भगवंता येथे ॥३५०॥
तो यमही असे मज घाबरून । आणि मृत्यू लपे मज पाहून । तोच मी थरथर कापून । घाबरे येथे ॥३५१॥
जया नाव विश्वरूप । ते तर मरणाचाही बाप । उठली ती भीति अमाप । अंतरी माझ्या ॥३५२॥
जेथे मृत्यूही होई हताश । ऐसी रागीट मुखे अशेष । आणि ठेंगणे वाटे ते आकाश । तया पुढती ॥३५३॥
ऐसे गगनाहुनी विशालपण । जयासी वाऱ्याही वेढता न येणं । आणि तप्त त्या वाफेनं । जळे पहा अंग ॥३५४॥
भिन्न भिन्न मुखे ती वाटतात । फरक आहे पहा रंगारंगात । प्रलयी करती ते मदत । अग्नीलाही ॥३५५॥
त्या अग्नीची उष्णता एवढी । स्वर्गाचीही होतसे राखोंडी । आणि त्रिभुवनाची ती माडी । टिकेच ना ॥३५६॥
जसा वाऱ्यास धनुर्वात चढला । वा समुद्र महापुरी पडिला । की संगे घेऊन वडवानला । निघाला अग्नी ॥३५७॥
जैसे विष अग्नी एकत्र झाले । वा मरणा मरण मदती आले । तैसे संहारक बा पाहिले । मुख तुझे ॥३५८॥
काय सांगू तयाची विशालता । अंतराळ ते तुटून पडता । आकाशी ती छिद्रता । दिसावी तैसी ॥३५९॥
पृथ्वी काखेत धरून । हिराण्यक्ष पाताळी गेला घेऊन । तेव्हा उघडले दार महादेवानं । पाताळाचे जसे ॥३६०॥
अनंत या तोंडाचा विस्तार । आणि जिभा त्या अति विखार । हे विश्वही त्यासी अपूरं । एका घासा ॥३६१॥
पाताळीचे नाग फुत्कारती । गरळज्वाळा आकाशी ओकती । आणि वावरे पहा जीभ ती । जबड्यामाजी ॥३६२॥
जसे प्रलयी समुदाय विजांचे । शृंगारती ते बुरूज गगनाचे । त्या दाढा तैसे बाहेर ओठाचे । चमकती देवा ॥३६३॥
कपाळाच्या खोलगट भागात ।डोळे भयासी असती घाबरवत ।जशा मृत्यूच्या लाटा लपतात ।अंधारामाजी ॥३६४॥
ऐसे दाऊन सोंग भयाचे । काय आहे तुला साधायचे । पहा भय मला मरणाचे । वाटे देवा ॥३६५॥
इच्छा होती ती विश्वरूपाची । पण प्रचीती आली भयाची । इच्छा तुला पहाण्याची । नच उरली आता ॥३६६॥
मातीचा देह जाईल मातीत । पर्वा तयाची मी नाही करत । परि वाटे चैतन्यच कदाचित । संपून जाई ॥३६७॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधु नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु हृदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्‌गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com
ई साहित्य प्रतिष्ठान®
www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात.  (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.

विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०